# यंदाचे शांततेचे नोबेल पुरस्कार

## चन्द्रशेखर पुरन्दरे

युद्धांतील बलात्कारित स्त्रियांसंबंधात काम करणाऱ्या दोघांना यावर्षीचा नोबेल पुरस्कार मिळाला.

नादिया मुराद नावाची इराकी स्त्री आणि डेनिस मुक्वेगे हे काँगो या आफ्रिकन देशातील डॉक्टर.

**नादिया मुराद**

इराकच्या उत्तर भागात याझिदी नावाची अल्प-संख्यांक जमात रहाते. ते मुस्लिम नाहीत. त्यांचा धर्म वेगळा आहे आणि त्यात झोरॅष्ट्रीयन, ज्यू, ख्रिश्चन व इस्लाम या धर्मश्रद्धांचे मिश्रण आहे. ते मुख्य प्रवाही सुन्नी मुसलमानांना नेहेमीच काफिर - धर्मद्रोही — वाटत आलेले आहेत. त्यांच्या समूळ वंशच्छेदाचे आजवर ७३ ऐतिहासिक प्रयत्न झालेले आहेत. ही विद्वेषाची तीव्रता. या पार्श्वभूमीवर इस्लामिक स्टेट (यापुढे स्टेट) या विकृत कडव्या सुन्नी मुस्लिम शक्तीचा उदय या प्रदेशात झाला. त्यांच्या 'धर्मयोद्ध्यांना' दिलेल्या लिखित आदेशांनुसार याझिदी स्त्रियांना किंवा कोणत्याही अ-मुस्लिम स्त्रीला. लैंगिक भोगांसाठी गुलाम करायला मुभा दिली गेली. या स्त्रियांपुढे दोनच पर्याय — एक इस्लाम स्वीकारायचा किंवा मृत्यू. आणि इस्लाम स्वीकारला तरी लैंगिक गुलामगिरीतून सुटका नाही. त्यात याझिदी विवाहबाह्य शरीरसंबंध व धर्मांतर मान्य करत नाहीत. अशा स्त्रियांना मृत्युदंड. म्हणजे परतीचा मार्गही बंद.

ऑगस्ट २०१४मध्ये इस्लामिक स्टेटने इराकमधील सिंजर प्रांतावर व त्यातील कोचो नावाच्या गावावर (हे नादियाचे गाव) ताबा मिळवला. ज्यांना शक्य होते ते सुमारे ५०हजार लोक प्रांत सोडून डोंगराळ प्रदेशात गेले. गावात राहिलेल्या पुरुष व स्त्रियांना विभक्त करण्यात आले. पुरुषांना व बलात्कार करण्यास 'अपात्र' म्हणजे वृद्ध स्त्रियांना ठार मारण्यात आले. त्यात नादियाचे सहा भाऊही होते व कदाचित आईही. इतर 'लायक' स्त्रिया/ मुली 'योद्ध्यांच्या' लैंगिक सुखासाठी उपलब्ध झाल्या. तेव्हा नादिया एकवीस वर्षाची होती.

इतर याझिदी स्त्रियांसारखेच तिच्यावर अनेक सामूहिक बलात्कार झाले. त्या सगळ्या जणींना मोसुल या इस्लामिक स्टेटच्या तेव्हा ताब्यात असणाऱ्या शहरात एका इमारतीच्या पहिल्या मजल्यावर डांबून ठेवण्यात आले. नादियाच्या वर्णनाप्रमाणे हा बाजार रोज संध्याकाळी सुरु व्हायचा. तळमजल्यावर जिहादी त्यांची नावे रजिस्टरमध्ये द्यायचे, भोगलेली मुलगी आता त्यांना नकोशी झाली असली तर तिला परत करून नव्या मुलीच्या शोधासाठी वरच्या मजल्यावर यायचे. तेथे पहिला पुरुष येताच भीतीने या मुली कासावीस होत, जमिनीवर गडाबडा लोळण घेत, ओकू लागत, किंचाळत. मुली 'कुमारिका' आहेत याची तेथील रक्षकाकडून जिहादी खात्री करून घेत. मग ते त्यांची शरीरे चाचपत, केस आणि तोंड तपासत, जणू दुकानातून पाळीव प्राण्याची खरेदी करायची आहे. त्यातील एक राक्षसी आकाराचा दुर्गंधी जिहादी नादियाकडे आशाळभूतपणे पहात होता. 'मला फक्त जमिनीवर अगतिकपणे आक्रोश करणाऱ्या इतर मुली व पुरुषांचे पाय दिसत होते. त्यातल्या त्यात लहान पाय असणाऱ्या पुरुषाला मी 'मला तुम्ही न्या, माझे काहीही करा' अशा विनवण्या केल्या कारण 'तो' राक्षस नको.' हा हाजी सलमान नावाचा इसम स्टेटचा स्थानिक न्यायाधीश होता त्यामुळे तो तिला नेत आहे म्हटल्यावर कोणी आक्षेप घेतला नाही. रजिस्टरमध्ये कोणाकडे कोणती मुलगी जात आहे याची नोंद करण्यात आली व मग ती त्याची गुलाम झाली.

तो रोज तिच्यावर बलात्कार करत असे, घरकाम नीट केले नाही म्हणून, त्याचा दिवस बरा गेला नाही म्हणून, बलात्कारादरम्यान तिने डोळे मिटून घेतले म्हणून, कोणत्याही कारणाने तो तिला चाबकाने फोडून काढत असे. इस्लामी वचने म्हणायला लावत असे जेणे करून धर्मांतर सुरु होईल. जिहादी

बलात्काराच्या आधी व नंतरही देवाची प्रार्थना करत ज्या योगे ही ‘सेवा’ भगवंताच्या दरबारी रुजू होईल. नादिया सलमानची चौथी गुलाम होती. तिने पळून जाण्याचा प्रयत्न केला. तो प्रथम फसला. मग परत एकदा ती मोसूल शहरात सैरावैरा पळत गेली. दिसेल त्या पहिल्या घराचे दार ठोठावले. त्या लोकांनी तिला आश्रय दिला. त्यांचे हे मोठेच धारिष्ट्य कारण आश्रय देणे त्यांच्या जीवावर बेतले असते. मग त्यांनी तिला प्रथम कुर्दिस्तान व नंतर जर्मनीला जायला मदत केली. अखेर ती मुक्त झाली.

ही एक नादिया हे भयनाट्य सांगायला जिवंत तरी राहिली आणि पश्चिमेत आल्यामुळे सुरक्षिततही. अशा शेकडो नादियांवर काय परिस्थिती इस्लामिक स्टेटने आणली हे ती जगाला सांगू शकली. नादियाने आजवर तिची कहाणी युनो, युरोपिअन युनिअन पासून अनेक व्यासपीठांवर सांगितली आहे व जगभर सांगत आहे. त्यामुळे स्टेटकडून तिच्या जीवाला धोके आहेत. स्टेटला सामील झालेला तिचाच एक नातलगसुद्धा तिला आता फोनवरून धमक्या देतो. या धैर्याच्या आणि कळकळीचा सन्मान म्हणून तिला यंदाचा नोबेल पुरस्कार देण्यात आला. नादियाचे ध्येय स्टेटच्या अशा प्रत्येक गुन्हेगाराला न्यायालयात खेचण्यासाठी जागतिक दबाव निर्माण करणे. ते किती दुर्धर आहे, हे काँगोच्या पुढील उदाहरणावरून लक्षात येईल.

मुळात स्टेटचा उदय होण्याचे प्रमुख कारण म्हणजे अमेरिकेचे इराकवरचे आक्रमण. त्यामुळे सद्दाम हुसेनची राजवटच उलथली गेली असे नाही तर सगळी समाजव्यवस्थाच कोसळली. या पोकळीत अनेक इराकी आतंकवादी झाले. तेव्हा जग प्रेक्षक होते. आता हा पुरस्कार देऊन त्या पापाचे थोडे फार परिमार्जन करण्याचा प्रयत्न आहे.

**डॉ. डेनिस मुक्वेगे**

काँगो या आफ्रिकन देशात सतत युद्धे चालू असतात. हुतू -तुत्सी जमातीतील वैर, देशाच्या सरकारचे गनिमी विरोधकांशी वैर, शेजारच्या रवांडा देशाशी काँगोचे वैर व प्रामुख्याने देशातील खनिज-खाणींवर ताबा मिळवणे असे अनेक पदर या युद्धांना आहेत.

एक उदाहरण म्हणजे१९९४च्या हुतू -तुत्सी युद्धात अडीच ते साडेतीन लाख तुत्सी स्त्रियांवर बलात्कार झाले. जननेंद्रियावर तीक्ष्ण शस्त्रांनी जखमा करणे, बंदुकीने गोळ्याही घालणे, इत्यादी. इजा जीवघेण्या व पुनरुत्पादन अशक्य. एड्सचे पेशंट्स हॉस्पिटलातून सोडवण्यात आले, त्यांनी स्त्रियांवर बलात्कार केले आणि एड्स त्यांच्यापर्यंत पोचवला.

सध्याचे युद्ध १९९६पासून चालू आहे. तीव्रतेत आणि विस्तारात २०१६पासून त्यात भरच पडत आहे. निर्वासितांच्या प्रश्नाचा अभ्यास करणाऱ्या नॉर्वेच्या एका संघटनेनुसार स्त्रिया व मुले यांच्यावर शक्य आहेत ते सगळे लैंगिक अत्याचार वाढत आहेत. तेथील परिस्थिती सीरिया आणि येमेनशी तुलना करण्याइतकी गंभीर आहे पण जगाचे या प्रदेशाकडे तितके लक्ष नाही.

डॉ. मुक्वेगे आज ६३वर्षांचे आहेत. ते स्त्री-रोग तज्ञ आहेत. १९९९साली त्यांनी हॉस्पिटल सुरु केले. प्रसूतीत होणाऱ्या गुंतागुंतींवर स्त्रियांवर उपाचार करावेत हा प्रथम उद्देश होता. पण युद्धातील बलात्कारित स्त्रियांचा अखंड ओघ पहाता त्यांनी त्या स्त्रियांवर ऑपरेशन करून उपचार करण्याचे ठरवले. आजवर अशा कित्येक हजार (अंदाजे २०हजारापासून ८५हजारपर्यंत) स्त्रियांवर त्यांनी इलाज केले आहेत. त्या स्त्रियांना पुनर्जन्मच मिळाला. त्यांनी पाहिलेली सगळ्यात भयानक केस म्हणजे एका दीड वर्षाच्या मुलीचे गुप्तांग छिन्नविछिन्न करण्यात आले होते.

मध्यंतरी काँगोच्या लष्कराच्या एका अधिकाऱ्यावर आंतरराष्ट्रीय कोर्टात बलात्कारांचे नियोजन करणे व मानवतेविरुद्ध इतर गुन्हे करणे यासाठी खटला भरण्यात आला. तो निर्दोष सुटला एवढेच नाही तर देशाच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठी त्याने उमेदवारीही जाहीर केली. व्यवस्थेची कीड व दहशतीचे वातावरण असे आहे. हा परदेशी कोर्टात गेला म्हणून गाजलेला खटला. स्थानिक पातळीवर गुन्हेगार पकडले जात नाहीत ही वस्तुस्थिती. खटला दूरच.

सप्टेंबर २०१२ला मुक्वेगेंनी युनोमध्ये भाषण देताना काँगोमधील युद्धातील स्त्री-बळींची ही भीषण स्थिती सांगितली. हे बलात्कार पूर्वनियोजित असतात हे विशद केले. हा हिंसाचार थांबवण्यासाठी जगाने तातडीने व निष्ठेने प्रयत्न करायला हवेत असे प्रतिपादन केले. त्याची प्रतिक्रिया म्हणून पुढच्याच महिन्यात ऑक्टोबरमध्ये चार मारेकऱ्यांनी त्यांच्या घरावर हल्ला केला. ते घरी नव्हते. त्यांच्या मुलींना ओलीस ठेवून मारेकरी त्यांची वाट पहात राहिले. मुक्वेगे आल्यावर त्यांच्या अंगरक्षकाने प्रतिकार केला, त्याला मारेकऱ्यांनी ठार केले. मुक्वेगे जमिनीवर पडून राहिले म्हणून वाचले. त्यानंतर ते युरोपला स्थलांतरित

झाले. त्यांचे हॉस्पिटल त्यांच्या अनुपस्थितीत नीट चालेना. मग त्यांच्या पेशंट्सनी फळे, भाज्या विकून त्यांना परतीचे तिकीट काढण्यासाठी पैसे उभे केले. या सर्व अति-गरीब खेड्यातल्या महिला. त्यांची रोजची मिळकत एक डॉलरहून कमी. पण दर आठवड्याला त्या जमलेले पैसे हॉस्पिटलला देत. त्यांनी ५० डॉलर्स जमवले. 'त्यांचा त्याग माझ्या त्यागापेक्षा मोठा आहे' या जाणीवेने काही महिन्यातच मुक्वेगे परतले आणि त्यांनी त्यांचे कार्य चालू ठेवले आहे. त्यांना नोबेल मिळाल्यावर काँगोच्या सरकारने 'ते प्रश्नाचे राजकीयीकरण करतात' अशी टिप्पणी केली. ही सरकारची वृत्ती.

**निरीक्षण**

स्त्रियांवर व पुरुषांवर बलात्कार हे युद्धाचे तंत्र असते. त्यामुळे त्या समाजाचे खच्चीकरण होते. आफ्रिकेतील इतर युद्धात, विशेषत: उत्तर सुदानमधील अरब आक्रमक आणि दक्षिण सुदानमधील कृष्णवर्णीय यांच्यातील युद्धात बलात्कार झालेल्या स्त्रीचा घोट्याखालचा पाय तोडण्यात येत असे. उद्देश हा की ही स्त्री बलात्कारित आहे हे सगळ्या समाजाला कळावे. कदुंबीय, समाज अशा स्त्रियांना वाळीत टाकतात. त्यामुळे तिच्या आरोग्याचे व प्रश्नाचे गांभीर्य वाढते.

या नोबेल पुरस्काराने स्त्रियांचे युध्दातील लैंगिक शोषण हा विषय तरी पुढे आला. युद्धातील बलात्कार हा गुंतागुंतीचा प्रकार आहे. प्रत्येकवेळी लष्करच अत्याचार करते असेही नाही. एकूण अस्थिर वातावरणाचा फायदा घेऊन नागरी बलात्कारही होतात. त्यात बळीलाच गुन्हेगार म्हणून वागवणे हे जगात इतर बाबतीत घडते, तेच इथेही. त्यासाठी समाजाची मानसिकता बदलणे, त्याआधी युद्धेच न होणे - हे नजीकच्या भविष्यात अशक्यप्राय वाटते.

पुरुषांवरील बलात्कार हा वेगळ्या लेखाचा विषय होईल.

**www.art-non-deco-com**
**artnondeco@yahoo.co.uk**

---

**संपादकीय – पान ५ वरुन...**

जनता संविधानिक अधिकार, हक्क आणि जबाबदाऱ्या याबाबत पूर्णांशाने सचेत नाही, याचीही सत्ताधाऱ्यांना पुरेपूर जाणीव आहे. एका बाजूला म्हणूनच संविधानाबाबत जागरूकता वाढविण्यासाठी कोणतेही प्रयत्न करायचे नाहीत आणि दुसरी कडे, कुणा जागरूक संस्था, संघटना, आंदोलनाने जाब विचारायचा संविधानिक प्रयत्न केला तरी त्यांना चिरडून टाकणे किंवा नक्षलवादी म्हणत आरोपीच्या पिंजऱ्यात सडविणे अशी यांची बिनदिक्कत चालबाजी सुरु आहे. या सर्व गदारोळात, अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या हवामान बदल आंतर सरकारीय आयोगाच्या (Inter Governmental Panel on Climate Change - IPCC) अहवालात हवामान बदलाच्या संकटाबाबत गांभीर्याने भान राखण्यावर भर दिलेला आहे. संविधानाबरोबरच संसाधनाचे संवर्धन सातत्याने व चिकाटीने करीत राहणे, ही काळाची गरज या अहवालाने पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे!

संविधान मसुदा समितीने मूळ संविधान राष्ट्रपतींकडे सादर करण्याच्या संविधान दिनाला याच महिन्यात २५ तारखेला ६९ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यावेळी बाबासाहेबांनी केलेल्या भाषणात हा धोका दूरदृष्टीने ओळखला होता. २६ नोव्हेंबर १९४९ रोजीच्या त्यांच्या भाषणातील एक महत्वाचा आशय होता की, संविधान कितीही चांगले असले तरी ते अंमलात आणणारे नालायक किंवा निरुपयोगी असतील तर हेच संविधान वाईट ठरू शकेल. त्याआधी मूलभूत अधिकारांवरील चर्चेच्या समारोप प्रसंगी ते म्हणाले होते की, केवळ संसद, केवळ न्यायालये किंवा केवळ एखादा कायदा नागरिकांना मूलभूत अधिकारांची खात्री देऊ शकत नाही तर समाजाचा सद्सद्विवेकच नागरिकांना ही खात्री देऊ शकेल. संविधान सन्मान जागर हा या अर्थाने समाजाचा सद्सद्विवेक जागा करण्याचा समन्वयाचा एक पुढचा प्रयत्न आहे. स्वातंत्र्य आंदोलनातील स्वतंत्र भारताचे रेखाटलेले स्वप्न समजून घेणे, त्या आंदोलनाच्या गर्भातून उभ्या राहिलेल्या संविधानातील नागरिकांचे हक्क, वंचित घटकांच्या विकासासाठी असलेल्या तरतुदी आणि धर्मनिरपेक्ष, समतावादी, संसाधनांच्या संरक्षणाला बांधील असा देश उभारण्याबाबत असणारी कलमे समजून घेणे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे, तशी संधी सर्वांना उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारवर तर आहेच पण समन्वयासारख्या स्वयंसेवी संघटनांवरही आहे! त्यामुळेच विद्यमान फॅसिस्ट शक्ती सत्तेवरच येणार नाही, केवळ याकरिता नाही तर त्यांचे देश विघातक कारनामेच बंद होतील या दिशेने काम करायला हवे. **उद्या सत्ता परिवर्तन झाले तरी नव्याने सत्तेवर येणारा पक्षही अशाच वाटेने जाणार नाही, यासाठी त्यानंतरही निरंतर प्रयत्न होणे गरजेचे आहे. समविचारी संघटनांच्या सहकार्याने हे आव्हान समन्वयाला येणाऱ्या काळात निश्चितच पेलायचे आहे!**